जा.क्र. पोआ/ १४६० /२०२१
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
दिनांक .०२.२०२१

**विषय :- साथीचे रोग प्रतिबंधक कायदा १८९७ च्या कलम २, ३, ४ अन्वये व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ६८ प्रमाणे सर्व संबंधित नागरिकांनी कोरोना विषाणु संसर्ग (कोव्हिड - १९) ला प्रतिबंध घालण्यासाठी मास्क परिधान करणे अनिवार्य केलेबाबत आदेश.**

२) ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने साथीचे रोग प्रतिबंधक कायदा १८९७ कलम २,३,४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार कोरोना २०२० / सीआर/५८/आरोग्य ५ दिनांक १३/०३/२०२० अन्वये कोव्हिड - १९ ला प्रतिबंध व आळा घालण्यासाठी नियम लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. आणि महाराष्ट्र शासन आदेश नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१ महाराष्ट्र शासन महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन,पुनवर्सन मंत्रालय दिनांक.२३.११.२०२० अन्वये अधिसुचना जारी करुन सुधारीत आदेशाव्दारे लॉकडाऊन आदेशाची मुदत पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

३) आणि ज्याअर्थी सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक ०७/०४/२०२० क्रमांक कोरोना-२०२० /प्रक./५८/आरोग्य ५ महाराष्ट्र कोव्हिड - १९ प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हिड - १९ उपाययोजना नियम - २०२० अन्वये जारी अधिसुचनेनुसार १) साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार पोलीस आयुक्त यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड - १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

४) ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरात कोरोना बाधित रूग्णांची संख्या चिंताजनकरित्या वाढत आहे. आणि शहराच्या काही भागात कोव्हीड - १९ चे क्लस्टर निर्माण झाले असून त्या परिसरात मोठया प्रमाणात रुग्ण संख्येत वाढ झालेली दिसत आहे. त्यामुळे कोव्हीड -१९ चा सामुदायिक प्रसार (Community Transmission) सुरु होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जिवीताला धोका निर्माण होण्याचा संभव निर्माण झाला आहे.

५) आणि ज्याअर्थी सदयस्थितीत अभ्यासपुर्ण निरीक्षणातुन असे आढळुन आले आहे की, अनिवार्य सामाजिक अंतर (सोशल डिस्टंन्स) या उपाययोजना व्यतीरिक्त तोंडावर मास्क परिधान केल्याने कोरोना विषाणुचा प्रसार परस्परांशी संपर्क साधणा-या व्यक्तींकरिता कमी होवु शकतो तसेच कोरोना विषाणुच्या प्रसारास आळा बसु शकतो.

६) आणि ज्याअर्थी उपरोक्त बाब विचारात घेता मी अशा निष्कर्षापर्यंत आलो आहे की, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी संचार करणा-या प्रत्येक व्यक्तीस मास्क परिधान करणे आवश्यक बनले आहे.

७) त्याअर्थी **मी कृष्ण प्रकाश, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** तथा सक्षम अधिकारी शासनाच्या दिनांक ०७/०४/२०२० चे अधिसुचनेव्दारे सक्षम अधिकारी म्हणुन प्राप्त अधिकारान्वये व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे अधिकारानुसार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनाकामी खालील प्रतिबंधात्मक निर्देशांची अंमलबजावणीचे आदेश **दिनांक १७ .०२.२०२१ चे ००/०१ वा. पासुन पुढील आदेशापर्यंत लागु करीत आहे.**

अ)शासन परिपत्रका अन्वये शहरातील प्रत्येक नागरिकांने शहरातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी शासकिय व खाजगी कार्यालये या ठिकाणी संचार करताना मास्क वापरणे बंधन कारक करण्यात आले आहे.

ब) सर्व व्यक्तींना/ नागरिकांना कोणत्याही उद्देशाने / हेतुने आणि कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही अधिकारात सार्वजनिक ठिकाणी जसे की, सर्व मंगलकार्यालये, सांस्कृतीक सभागृह, सर्व प्रकारचे सामाजिक, धार्मिक,राजकीय, क्रिडा मनोरंजन, सांस्कृतीक,शैक्षणीक

उपक्रम,सभा संमेलन व तत्सम मोठया संख्योने लोक एकत्र येवू शकतील अशा प्रकारचे कार्यक्रमाचे ठिकाणी सर्व नागरिकांना संचार करताना मास्क व सॅनिटाझरचा वापर करणे बंधनकाकरक आहे. त्याच प्रमाणे यापुर्वी निर्गमित केलेल्या आदेशा नुसार उपरोक्त सर्व ठिकाणी नागरिकांची गर्दी होणार नाही याची संयोजकांनी दक्षता घ्यावी जेणे करून कोव्हीड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधीत करणे शक्य होईल तसेच या पुर्वी निर्गमित केलेल्या आदेशामध्ये नमुद केले नुसार उपरोक्त ठिकाणी उपस्थीत नागरिकांच्या संख्येचे पालन होणे आवश्यक आहे.

क) पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे क्षेत्रातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट, उपहारगृहे इत्यादी ठिकाणी नागरिकांना संचार करताना मास्क व सॅनिटाझरचा वापर करणे बंधनकाकरक राहिल

ड) पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे क्षेत्रातील सर्व मनपा कार्यालये तसेच सरकारी व खाजगी कार्यालयामध्ये मास्क व सॅनिटाझरचा वापर करणे बंधनकाकरक राहिल.

इ) महाराष्ट्र म्युनिसिपल ॲक्ट २०११ च्या कलम ६९ नुसार मला कायदयाने प्रधान केलेले अधिकार मी सक्षम अधिका-यास सुपूर्त करू शकतो त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे क्षेत्रातील सर्व अधिकारी व अंमलदार यांना मास्क न वापरणा-या नागरिकांना रक्कम रूपये ५००/ व रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणी थुंकणा-या नागरिकास रक्कम रुपये १०००/- रुपये तडजोड शुल्क आकारणेचे सर्व अधिकार कारवाई प्रभावी व कडक परिणाम होण्याच्या दृष्टीने सुपूर्त करण्यात येत आहेत.

ई) पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे क्षेत्रात नागरिकांची गर्दी होणा-या ठिकाणी सर्व प्रभारी अधिकारी यांनी वेळोवेळी भेटी देवून नागरिक मास्क वापरा बाबतच्या आदेशाचे पालन करत आहेत किंवा नाहीत याबाबत पहाणी करावी व जे नागरिक मार्गदर्शक सुचनांचे उल्लघन करत आहेत त्याचेवर कडक कारवाई करावी.

उ) मुखपट्टी (मास्क) वापरण्याबाबत यापुर्वी निर्गमित केलेले आदेश कायम राहील.

ऊ) यापुर्वी वेळोवेळी परवानगी देण्यात आलेले सर्व उपक्रम, त्याकरिता निर्गमित केले आदेश व मार्गदर्शक सुचना नुसार पुढील आदेशापर्यंत सुरु राहतील.

फ) यापुर्वी वेळोवेळी पारित तसेच निर्गमित केलेले आदेश/ मार्गदर्शक सुचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील

८) सदर आदेशातील निर्देशांचे / सुचनांचे उल्लंघन केल्यास सबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलित कायदयातील तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फा काढण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक१९.०२.२०२१ रोजी दिलेला आहे.

(कृष्ण प्रकाश)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :-१९.०२.२०२१